महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : irdho123@gmail.com website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/कामगार कल्याण निधी/१०१३६ दिनांक : ०१/०४/२०२४

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनीत कार्यरत असलेले वेतनगट ३ व ४ मधील नियमीत कर्मचारी व कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचा माहे जून व डिसेंबर मध्ये भरण्यात येणाऱ्या कामगार कल्याण निधीच्या सुधारीत दराबाबत.

**संदर्भ :** 'महाराष्ट्र शासन राजपत्र' दि. १८ मार्च २०२४.

**********

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमानुसार, महावितरण कंपनीच्या आस्थापनेवर माहे जुन व डिसेंबर या महिन्यात कार्यरत असलेल्या वेतनगट ३ व ४ च्या नियमीत कर्मचाऱ्यांचा तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचा प्रत्येक वर्षी माहे जून व डिसेंबर मध्ये कामगार कल्याण निधी, कामगार कल्याण मंडळाकडे भरणा करण्यात येतो.

आता, **'महाराष्ट्र शासन राजपत्र'** दि. १८ मार्च २०२४ अन्वये महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) अधिनियम, २०२४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमाच्या कलम ६ ब ब मध्ये पोट कलम (२) ऐवजी पुढील पोट कलम दाखल करण्यात येईल.

"(२) प्रत्येक नोकराच्या बाबतीत, आणि अशा प्रत्येक नोकरासाठी मालकाच्या बाबतीत, प्रत्येक सहा महिन्यांनी प्रदेय असलेल्या अंशदानाची रक्कम पुढील दराने असेल:-

**(अ) ज्या नोकराचे नाव अनुक्रमे दि. ३० जुन व ३१ डिसेंबर रोजी, आस्थापनेच्या नोंदवहीत आहे अशा नोकराच्या बाबतीत, पंचवीस रुपये इतका दर असेल:**

परंतु, राज्य शासन, मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासकीय राजपत्रातील अधिसुचनेद्वारे, नोकराच्या अंशदानाच्या दरात, प्रत्येक तीन वर्षातून एकदा वाढ करेल, तथापि, असे की, अशी वाढ, अंशदानाच्या दराच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही;

**(ब) खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक नोकरासाठी, मालकाच्या बाबतीत, नोकराने प्रदेय असलेल्या रक्कमेच्या तीन पट."**

वरीलप्रमाणे, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) अधिनियम, २०२४ नुसार दि. १८ मार्च २०२४ पासून कामगार कल्याण निधीच्या दरात सुधारणा करण्यात आली असून, निर्धारित करण्यात आलेले खालीलप्रमाणे कामगार कल्याण निधीचे सुधारीत दर कर्मचाऱ्यांच्या / कंत्राटी कामगारांच्या माहे जुन -२०२४ च्या वेतनातून कपात करुन कामगार मंडळाकडे वर्ग करणे आवश्यक आहे.

| **माहे जुन व डिसेंबर मध्ये भरणा करण्यात येणाऱ्या कामगार कल्याण निधीचा तपशील** | **कर्मचारी / कंत्राटी कामगारांचा वाटा** | **कंपनी / कंत्राटदाराचा वाटा** | **एकत्रित वाटा** |
|---|---|---|---|
| सुधारीत दर | २५ | ७५ | १०० |

सबब, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) अधिनियम, २०२४ नुसार कर्मचारी / कंत्राटी कामगारांच्या माहे जुन व डिसेंबर च्या वेतनातून सुधारीत दराने कामगार कल्याण निधीची कपात करुन कामगार कल्याण मंडळाकडे वर्ग करण्यात यावी.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee_Portal_Circular_I.R.Dept. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सोबत : 'महाराष्ट्र शासन राजपत्र' दि. १८ मार्च २०२४.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत :-
१. प्रेषण यादीप्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.
२. उप महाव्यवस्थापक (मा.व तं.- संपर्क पोर्टल), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
   - कृपया संपर्क पोर्टलमध्ये कामगार कल्याण निधीच्या सुधारीत दराची नोंद करण्यात यावी.
३. कार्यकारी अभियंता (स्थापत्य), स्थापत्य विभाग, वांद्रे (पूर्व), मुंबई.
   - सदर परिपत्रकानुसार सुधारीत दराने कामगार कल्याण निधीची कपात करण्याबाबत आपल्या अंतर्गत कार्यरत कंत्राटदार संस्थेस निर्देशित करण्यात यावे.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक ९(८)] सोमवार, मार्च १८, २०२४/फाल्गुन २८, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.—** महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १-२ |

दिनांक १६ मार्च २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १८ मार्च २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५३ चा ४०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६बब ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमाच्या कलम ६बब मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :– १९५३ चा ४०.

"(२) प्रत्येक नोकराच्या बाबतीत, आणि अशा प्रत्येक नोकरासाठी मालकाच्या बाबतीत, प्रत्येक सहा महिन्यांनी प्रदेय असलेल्या अंशदानाची रक्कम, पुढील दराने असेल :-

(अ) ज्या नोकराचे नाव, अनुक्रमे, दिनांक ३० जून व ३१ डिसेंबर रोजी, आस्थापनेच्या नोंदवहीत आहे अशा नोकराच्या बाबतीत, पंचवीस रुपये इतका दर असेल :

परंतु, राज्य शासन, मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नोकराच्या अंशदानाच्या दरात, प्रत्येक तीन वर्षांतून एकदा वाढ करील, तथापि, असे की, अशी वाढ, अंशदानाच्या दराच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही ;

(ब) खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक नोकरासाठी, मालकाच्या बाबतीत, नोकराने प्रदेय असलेल्या रकमेच्या तीनपट. " .

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.